स.१९२४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2970

…क दामोदर सांवरकर.

कृत

# सप्तर्षि.

[ कारागृहांतील प्रथमान्हिकी. ]

## तुरुंगांतील पहिला दिवस.

मुंबई.

१९२४.

किंमत ४ आणे.

सन १९२४
अ.क्र. २१९०

बॅ. विनायक दामोदर सांवरकर.



मुक्ततेनंतर.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# पथ-दर्शन.

मागें आह्मीं एकदां आख्यायिका ऐकली होती कीं, त्यावेळीं बॅरिस्टर सावरकरांना पन्नास वर्षांची शिक्षा कायम होऊन ठाणें जेलमध्यें आणलें, तेव्हां तेथील सर्वांतला हीन व निर्घृण हृदयाचा 'वार्डर', यांच्यावर पहारा करण्यास ठेवण्यांत आला होता. परंतु त्या हृदयहीन वार्डरलासुद्धां बॅरिस्टर साहेबांची मधुर वाणी ऐकून, त्यांचा रुबाब पाहून व त्यांना पन्नास वर्षांची घोर शिक्षा झाली, हें कळून जणुं काय नवीन हृदयच उत्पन्न झालें, असें झालें व तो कळवळून बॅरिस्टर साहेबांना ह्मणाला, 'काय! पन्नास वर्षांची शिक्षा! साहेब, आपण हें कसें सहन कराल?' हें ऐकतांच क्षणाचाहि विलंब न लावतां बॅरिस्टर साहेब सस्मित उद्गारले, 'अरे वेड्या! पन्नास वर्षें यांचें राज्य तरी राहील काय?'

'वज्रादपि कठोर' हृदयानें हें दिलेलें उत्तर ऐकून त्या वार्डरला काय वाटलें असेल हें सांगण्याची आवश्यकता आहे काय? तो त्याच दिवसापासून त्यांचा दास झाला. व ते ठाण्याच्या तुरुंगांत असे तों त्यानें त्यांची त्याच्या परिस्थितींत शक्य ती बरदास्त ठेविली.

लोकोत्तर पुरुषांच्या हृदयाची एक बाजू ही अशी ' वज्रादपि कठोर ' असते. परंतु, दुसरी एक बाजू ' मृदूनि कुसुमादपि ' हि असते. प्रभु रामचंद्रानें ' आराधनाय लोकानां ' त्यांचें ' हृदयं द्वितीयं ' अशी जी जानकी, तीहि त्यक्त करून, आपल्या हृदयाचें कर्तव्य–कठोर वज्रपण जगास दाखविलें. परंतु तेच रामचंद्र, पुन्हां जेव्हां दंडकारण्यांत आले, तेव्हां पूर्व परिचित, जानकीसह केलेल्या विलासस्थलांच्या दर्शनानें, कसे, ' मृदूनि कुसुमादपि ' बनले व ' अपि दलति वज्रस्य हृदयं ' असा शोक त्यांनीं कसा केला, हें सर्व जनाला विश्रुतच आहे ! मोठीं माणसें, अवतारी पुरुष, हीं मोठीं खरीं, अवतारी खरीं, परंतु ' माणसेंच ', ' पुरुषच ' कांहीं प्रत्यक्ष पुरुषोत्तम नव्हे. तेव्हां त्यांच्यांतहि वज्रत्वाबरोबर कुसुमत्वहि असतेंच. मात्र सामान्य जनामध्यें व त्यांच्यामध्यें हाच फरक कीं, त्यांचें कुसुमत्व, कर्तव्याच्या कठोर मार्गांत आड येत नाहीं. कर्तव्य परिपालनांत ते वज्रप्राय असतात. परंतु, कर्तव्य परिपालनानंतर, ते एकांतांत 'कुसुमादपि' मृदुल होतात. लढाईची धुमश्चक्री चालली असतां, हजारों तोफांना सरबत्ती देऊन, लाखों प्राणांचे बळी घेणारा नेपोलियन, ती लढाई संपतांच रात्रीच्या वेळीं त्याच्या तोफेनें घायाळ झालेल्या लोकांना शोधीत असतां व त्यांच्या यातना पाहून त्यांना सहाय्य देत असतां, एकाद्या अर्भकापेक्षांहि कोमल हृदय होऊन, त्यांच्या वेदनांची संवेदना जणुं

आपल्यालाच होत आहे असें वाटून, ढसढसां अनेक वेळीं रडल्याचें इतिहासांत नमूद आहे.

त्याचप्रमाणें बॅरिस्टर सांवरकर यांनीं, हिंद मातेच्या कष्ट–मोचनार्थ, त्यांना दिसलेल्या प्रकाशाप्रमाणें, भगिरथ प्रयत्न करीत असतां, लोकोत्तर पुरुषांच्या हृदयाप्रमाणें वज्रकठोरत्व दाखविलें, हें, त्यांचें जें अत्यंत अल्प चरित्र जनतेला अवगत आहे, त्यावरूनहि पूर्णपणें प्रत्ययास आलेलें आहे. व त्यांच्याबद्दलचा समग्र इतिहास जेव्हां केव्हां व जर कधीं कळण्याचा योग आलाच तर तें आधिकच सिद्ध होईल. आतां त्यांच्या हृदयाचें कुसुमकोमलत्व कसें आहे याचें प्रत्यंतर म्हणून ही कविता–काराहांगृतील प्रथमान्हिकी–सर्वांस यथार्थ कल्पना देईल अशी आशा आहे. ही कविता पूर्वींच बॅरिस्टर साहेबांचे एक सहयोगी, अंदमानमधून त्यांच्या आधीं सुटून आले होते, त्यांनींच मला मुखोद्गत केलेली कळविली होती. इतके दिवस ती, मी कुठेंच प्रसिद्ध केली नव्हती. व आतांहि इतक्यांतच करण्याचा मानस नव्हता. परंतु, माझे उद्योगी, उत्साही व देशसेवेचें व्रत अंगिकारलेलें तरुणमित्र श्री. वि. प. नागपूरकर, यांच्या आग्रहानें व चिकाटीनें, अखेर मला 'होकार' द्यावा लागलाच, व हा होकाराहि, बॅरिस्टरसाहेब कदाचित नाहीं म्हणतील, या भयानें, त्यांना न विचारतां मी आपल्याच जबाबदारीवर दिला.

पूर्व ऋणानुबंधानें व माझ्या भाग्याच्या परम उत्कर्षानें मला

बॅरिस्टरसाहेबांच्या सहोदरत्वाचा, अभिमानोत्पादक मान मिळाला आहे. व ह्मणून, संबंधी या नात्यानें, मीच प्रस्तावना लिहिणें हें थोडेंसें औचित्यबाधक आहे असें वाटण्याचा संभव आहे. परंतु, हे असे पुरुष, कांहीं एकाच कुटुंबाचे, एकाच जातीचे, इतकेंच काय, परंतु, एकाच प्रांताचेहि नसतात; ते सर्व देशाचे,—सर्वच देशांचे—असतात. व ह्मणून मी येथें जो हें पथदर्शन करावयास उभा राहिलों, तो वैयक्तिक बंधु या नात्यानें नव्हे; तर सार्वत्रिक देशबंधु या नात्यानें होय. आणि ह्मणूनच यानें औचित्य-भंगाचाहि दोष येऊं शकणार नाहीं.

या कवितांच्या करुणरसपूर्ण मानस सरोवरावर, वाचकांना कल्पनांचे राजहंस, काव्याच्या शीतल तुषारांनीं हर्षपुलकित होत होत, गंभीर तत्त्वज्ञानाच्या कमलततींवर, बोधाचा मधुर पराग सेवन करीत असलेले पाहतां येण्यास, व सरोवराच्या कारुण्यजलसंचयांत यथेच्छ अवगाहन करण्यास समर्थ बनविण्यास, हें इतकें पथ-दर्शन पुरें आहे. आतां येथून पुढें तें 'मानस'सरोवरच दिसेल. तें पहाण्याच्या आनंदांत, वाचकांनां माझी विस्मृति होण्याच्या आधींच मी त्यांच्या पथांतून पलीकडे होतों.

गिरगांव मुंबई,
८।७।२४

जनतेचा सेवक
**नारायण दामोदर सांवरकर.**

# प्रकाशकाचे दोन शब्द.

ह्या छोट्याशा पुतकांमध्यें ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा, वगैरेच्या अजुनहि ज्या चुका राहिल्या आहेत त्याची जाणीव आह्मांला आहे. जी शुद्धिपत्रिका जोडली आहे, तीहि ' मिया मुठभर व दाढी हातभर' अशी झाली आहे हेंहि आह्मांला कबूल आहे. तरीहि लोकमान्यांच्या जयंतीला हें पुस्तक बाहेर पडावें हा निश्चय केल्यानें ह्या सर्व दोषस्थलांकडे कानाडोळा करावा लागला. वाचकांना थोडेंसें विश्वासांतच घ्यावयाचें, तर इतकें सांगणें अवश्य आहे कीं हें पुस्तक तीन चतुर्थांश दुसऱ्या छापखान्यांत छापलें असून त्यांनीं प्रुफें तपासण्याची अत्यंत हयगय केली, शेवटचें प्रुफहि दाखविलें नाहीं, त्यामुळें तेवढ्या भागांत अतोनात अशुद्धि राहिली; अशा स्थितींत ही प्रत आम्हीं घेतली अर्थात् आह्मांला जें साहित्य मिळालें त्यावरच पुढें पूर्णता करणें भाग पडलें-ह्लींचें शुद्धिपत्र अगदीं अर्थविपर्यास वा अर्थहानि होण्याचा संभव वाटला तितक्याच स्थलांचे केलें आहे. ह्या काव्याचे सुविख्यात कवि कधीं चुकणार नाहींत, इतकी महाराष्ट्रीय वाचकांना त्यांची खात्री आहे. ह्मणून ज्या चुका त्या आमच्या

छापखान्यामधल्याच–हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. श्री. विनायकरावांच्या लेखणींतलें एकादें अक्षर कां होईना तें वाचण्यास महाराष्ट्र किती उत्कंठेनें तयार आहे हें नव्यानें सांगण्यास नको. ह्मणून सदोष छपाई कां होईना परंतु सत्वर हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरवून आह्मीं आज तें प्रसिद्ध करीत आहोंत. तरी दोषस्थलांकडे वाचक क्षमावृत्तीनें पाहतील अशी आशा आहे.

शेवटीं कारागृहांतील प्रथमान्हिकी जनतेपुढें सादर करण्याचा ज्या प्रमाणें आम्हांस लाभ मिळाला त्याचप्रमाणें स्वतंत्र वातावरणांतील प्रथमान्हिकी ही आपल्या ओजस्वी व मधुर वाणीनें जनतेस सांगण्याचा योग श्री. विनायकरावांना लवकरच येवो अशी परमेश्वराची प्रार्थना करून रजा घेतों.

सर्वांचा नम्र,
वि. प. नागपूरकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं.
ता.
ठाणे.

# शुद्धीपत्र.

१ ज्या ज्या ठिकाणीं × × × अशा तीन फुल्या आहेत त्या ठिकाणीं " पन्नास " हा शब्द समजावा.

| पान | आर्या | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ६ | करागृह | कारागृह |
| २ | ९ | क्ष्फुरलें | स्फुरलें |
| २ | ११ | फलशाची | फलाशाची |
| ३ | १७ | काटावरी | कोटावरी |
| ३ | २१ | झांकित | झांकति |
| ३ | २५ | ता, पद | तापद |
| ४ | २६ | बपद | होती |
| ४ | ३३ | भी | मी |
| ५ | ४० | मरण्या | भरण्या |
| ५ | ४० | अच्यत्तम | अत्युत्तम |
| ५ | ४० | पंचनीस | पंचवीस |
| ६ | ४३ | मत्कल्पनान | मत्कल्पना न |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ९८ | सुखघन | सुखघन तें |
| १० | ८८ | सत्यदी | सत्य दसें |
| १२ | १०१ | न घडा | न घडी |
| १२ | १०३ | जडजाव | जडभाव |
| १३ | ११८ | गनतो | गमतो |
| १३ | १२० | चिटपट | चित्रपट |
| १६ | १४५ | धरिनी | धरोनी |
| १६ | १४५ | येशा | येशी |
| १६ | १५० | दक्साफाल्यासि | इक्साफल्यासि |
| २२ | २०१ | तत्क्षम | तत्क्षण |
| २२ | २०५ | द्वेशदुष्ट | द्वेषदुष्ट |

दा. क. २८५३ सं. काव्य. नं. ५२० ता. २-१०-२५

## सप्तर्षि

( कारागृहांतील प्रथमान्हिकी )

# आर्या–गीति.

आशाचे! फळाशाचो!! एक्या घावें धृती कशा तडके ॥
मुक्ता वदली त्याचें कचांचि तसें मना तुझें मडकें ॥ १ ॥
गेहीं गेहीं स्वपुरीं फिरती घेऊनि दीप हातीं ता ॥
ज्यांसी हुडकूं निष्फल, परतुनि येतां गृहीं पहाती तां ॥ २ ॥
तस्कर ते अपुल्याची गेहीं निश्चित सर्व असलेले ॥
दीपा ! तुझ्याचि खालें पटल तमाचें लपूनि बसलेलें ॥ ३ ॥
आणी नैष्काम्याचा करितां उपदेश ते जगाला जो ॥
स्पृहणीय दाविलासी उत्साह अदम्यसा अगा लाजो ॥ ४ ॥
माझ्या मना! तशा तुज हें मन माझें असें ! अहा साचा ॥
हे सहसाश्रू माझे फुगवीतिल पूर सदुपहासाचा ॥ ५ ॥
वत्सर झाले, झाले करागृह गृह अनन्य मज; गमला ॥
नचि मोह: न चंचलवी, विरहाची ही असह्य आग मला ॥ ६ ॥

गमलें, स्वभावची हा बनला, निष्काम कर्म सांगतसें ॥
तो भास परि ! मना ! हा तवचि
निरुत्साह आज सांगतसे ॥ ७ ॥
न्यायालयांत होइल निर्णय जो, काय ही अनिश्चितता ॥
जाउनि होतांचि अजी मोचन ना शक्यही सुनिश्चितता ! ॥८॥
स्फुरलें नाम्हणुनि तुवां केला निश्चय मुळींच तें शमलें ॥
दिसले ना जें म्हणुनी नाहि तसेची मना ! तुला गमलें ॥९॥
पंथि अनिश्चित तेची परिती विघ्नांचि दत्त मी कुठले ॥
लपले विकारतस्कर गेहिंच ते हे तुझ्यावरी उठले ! ॥ १० ॥
आशाचि ! फलशाची ! स्वार्थाची ना ? तथापि आशाची ॥
विणेतचि परार्थाशा स्वार्थाच्या सम कठोर पाशाची ॥११॥

लांब नऊ न पदें जी रुंद पदें पांचही नसे पुरती, ॥
यद्भित्तींच्या भयसम काळें डांबर अलंकृती वरती ॥ १२ ॥
खिडकीना जाळीना एकहि; खोली अशीच अभगा, जे ॥
बंदी शाले मधिं ही एकलकोंडी म्हणोनिया गाजे ! ॥ १३ ॥

लोहगजांचें तिज हें दार अरुंदचि दिनीं हि कुलुपातें ।
लावूनि बंद ठेवायासी केवल ! नचक्षु उलुपातें ॥ १४ ॥
इतुकें पूर्ण विसंगत गमती ! बाजूंसि एकही न वसे ।
नीचहि हो परि माणुस कोणि न बोलावया मिळे नवसे॥१५॥

तेसेंची हें जेथें तरुपल्लव ही मिळेन नवसासी ।
अंगण अरुंद पुढतीं दुर्मुखलेलें-तयांत दिवसासी ॥ १६ ॥
वाळत उन्हांत पडतां कैद्यांची कांबळीं अणी तरटीं ।
कांटावरी समोरां बांधितसे घूक कावळा घरटीं ॥ १७ ॥
मानव-जाति-बहिष्कृत, पाहूं हीं ज्या मनांत दचकावें ।
एक्या राज्यास्तवही ज्या संबाधावयासि वचकावें; ॥ १८ ॥
संवाद-प्रिय इतुका मनुज मनाचा निसर्ग ! पापांशीं ।
एशांसही शिराणी गमतें बोलावयास, जें पाशीं ॥ १९ ॥
वा दुष्काळाच्या ह्या तळमळतो जीव कीं तुरुंगांत ! ।
चड्डी आणि बंडी खादीची रखरखीत अंगांत; ॥ २० ॥
टोपी नामा पिंवळी, झोळी झांकित कवच माथ्याचें; ।
एक चवाळें काळें, शयना कांटेरी तरट काथ्याचें ॥ २१ ॥
स्नाना पाना प्रातर्विधि समयास्तवाहे एकची होते ।
जलपात्र, अपात्राहे जे जस्ती हस्तार्थ मापटें होतें; ॥ २२ ॥
जस्ती पदक, प्रतिपादें बाक्षि पुकारित सजा सदा रुळते ।
चरणांत लोह दंडी बेडी दुस्वन भयाण खळखळते, ॥ २३ ॥
वाळें जिचे सकीलक कंटक, ती तीन शेर वजनाची ।
खाई दैव हतांचीं सोलुनि जी सांतडीं नवजनांची ॥ २४ ॥
बिलगे कटीसि ता, पद टाकूं नेदीच सहज दिवसाही, ॥
वळतां निजेत, पुसल्याविण डसतेची न भंग लव साही ॥२५॥

बपद् खोलीमाजी जेवूं बैसे तिथेंचि जडकुंडी ।
हट्ट फुंकुनियाजी घाण, घ्राणाकरीत रडकुंडी, ॥ २६ ॥
'तनुघृष्य ! निंद्य तनुही !' बोधित अवधूत कीं पिसा कोणी ।
शौचादि नित्य-कर्मी एक अनावृत असे चतुष्कोणी ॥२७॥
खायासि खापराची थाली, लंगोटि ही ह्रचित्ः-सारा ।
संसार आमुचा हा ! शिकवी तदधिक अवश्य न पसारा २८
जितुका जनीं अवश्यक समजुनि झटताति लोक मिळवाया ।
अनवश्यक तो, उवर तो, क्षीण करी व्यर्थ मनुज-बळ वायां २९
प्रातःकाळीं आला कळवूं, कारागृहाधिपति मजला ।
झाली सजा अहा ! ही वर्षें × × × कीं पुरी तुजला ॥३०॥
अभ्यास कठोरहि, ते हृदय तयाचें सखेद कळवळलें !
परि हें स्मित मद्वदनावरुनी, श्रवणें, न लेश मावळलें ॥ ३१ ॥
तोची वस्त्रें माझीं सहवासाचीं हिरोनिया मजशीं ।
देतां बंदीचीं, तीं केलीं धारण करीच राम जशीं, ॥ ३२ ॥
मंत्र तसाची वारंवार स्फूर्त्यर्थ मी तदा साचा ।
वर्णित राम विवासन जपतां तो श्लोक कालिदासाचा॰ ॥३३॥
जातांचि परी अधिपति सोडुनि मज एकला सशृंखल तो ।
सहसाचि लोट तत्क्षण दुःखाश्रूंचा अदम्य खळखळतो॥३४॥

---

॰ 'दधतो मंगलक्षौमे वसानस्यच वल्कले ।
दहशु र्विस्मिता स्वस्य मुखरागं समंजनाः ॥ कालिदास ॥

वर्षे × × × ! अहा ! वर्षे × × × हीं ! अहा ! वर्षे ! !
ध्वनि हा पुनः पुन्हां ही मजवरि पाऊस कीं तसा वर्षे ॥३५॥
वर्णित–राम–विवासन मंत्रहि तो म्यां पुनः पुन्हां जपला; ।
चळत्या धैर्यासहची उलटुनि वदली स्मृती।हि परि चपलाः–३६
सीते संगीं ऐशा अविकृत रामहि तव अहां कां ना ।
जातां सीता व्याकुल केलें वन देत करुण हाकांना ? ॥ ३७ ॥
अश्रु तुझ्याविरहाचे वृत्ति प्रीते ! न कोमला कांहीं ! ।
प्रीत ! हृदयाची तुजविण शोभाची नको मला कांहीं ! ॥३८॥
आणी पुनः पुन्हां ही ह्मणतां माझ्याचि मी मना "नाहीं" ।
मृत्त्यद्ध कवण पाही ? ? सोडि अशक्यान कामना नाहीं ॥३९॥
यावज्जीवन शिक्षा तीं वर्षे पंचवीसची गणती ।
पापकृत्तमास्तवही याहुनि बंदि अवधचि ह्मणती ॥ ४० ॥
होतो सिद्धचि शिक्षा शक्या अधिकांत अधिकही मरण्या ।
वर्षे आयुष्याचीं अच्युत्तम पंचवीस तीं करण्या ॥ ४० अ ॥
कारानलांत हुत मी तिळतिळ जाळोनि देह कार्यातें ।
अत्युत्तमाचे उद्धाराया जननी स्वभूमि आर्या तें ॥ ४० आ ॥
द्वीपांत राहुनी कीं–धैर्या उत्साह एक दे हाची ।
येऊं शकेन रक्षा ठेवूं या पुण्यभूत देहाची ॥ ४० इ ॥
परि × × × वर्षे ऐकुनि उत्साह तोहि कोसळला ।
सुकला तरंग अंतिम होता जो मृगजळांत सळसळला ॥४० ई॥

परचक्र दुर्विलासा-भोगी पडदा करूनि तमसाचा ।
अपराध देश जागृति, परवश देशांत घोरतम साचा ! ॥ ४१ ॥
तारे काय, सजा जी मज यावज्जीवन भरोनि न सरे ही ।
इच्छिति पर हे भरणें म्यां ती घेवूनि जन्म दुसरे ही ॥ ४२ ॥
शिक्षेच्या परिसीमेची परिसीमा ? न दुर्भगाठाया ।
शक्तस्वप्नीं देखिल होई मत्कल्पनान गांठाया ! ! ॥ ४३ ॥
दीर्घायूंची कोर्ती कृतिही स्मरली किती मनानें तीः ।
बंदींत त्या तई मम थोराथोरांसि कामना नेतीः ॥ ४४ ॥
वर्षीं अशीतितमिं नवरोजी क्षेत्रीं उभा स्वराज्याच्याः ।
तो श्रीकुमार खड्गा भीती देशघ्न भास्वराज्याच्याः ॥ ४५ ॥
तो डिझरायली, तो तत्प्रतिपक्षी ही, सुवाक्प्रभूवर ते ।
जे मल्ल झुंजती त्या लोकसभेच्या विवाद भूवरते ॥ ४६ ॥
ते जरि ऐशीं माजी देती तिशिच्याहि यौवना लाजे ।
कां हे निराशता मज सुटकेची ही छळी मनाला जे ? ॥४७॥
श्रीभाष्याची विणितां पावन-वाक्कुसुम-शुभ्र-माला ही ।
जो शुद्धबुद्ध भगवान् वीर पराभावि भवभ्रमालाही,-॥४८॥
तो बुद्ध !-अहा ! तों त्या तृष्णाच्छेदक पवित्र सत्स्मरणें ।
ये लज्जेने माझ्या तृष्णालंपट मनाप्रती मरणें ! ! ॥ ४९ ॥
तृष्णा समर्थनासी आठवि माझी विमूढ आशा ते ।
तृष्णाच्छेदक त्याची माराजितासी-स्वकीय नाशाते ! ! ॥५०॥

सत्कार्यपिपासाही तृष्णाचि न कां ? न सुख-विलासाची ।
तरि देशकार्य सक्तिहि विरहा हुनि जी छळी तुला साची ? ५१
वैतागें मी बघुनि धृतिचा ढळलाचि नित्य नेमः गती ।
दुःखद होय; दिवाळें काढुनियां आपुलें मनें मग तीं ॥ ५२ ॥
अपुली आशा पेढी जाळियली ! तों अहो कसें नवल !- ।
आशेच्या रक्षेंतुनि मंजूषा उद्भवे प्रभा--धवल !!! ॥ ५३ ॥
मन उत्साहें भरलेंः गुरुकिल्ली जी कृपा महंताची ।
त्या तुकयाची लावुनि, उघडुनि म्यां कुलुप तें अहंताची, ५४
उचली झांकण नैराश्याचेंः—आंतूनि सुख--निधान असें ।
सर्वोपाधि प्रभु जें, मोक्षाचें जें महाविधान असे ॥ ५५ ॥
तें वैराग्य--विनाशन, अनुरागाचा विकासची परि तो ।
चिंतामणि सम चमके ! चिद्रूप्या मी महोत्सवा करितो ॥५६॥
बंदी × × × चिना वर्षे ? × × × कल्पनाही तो ।
आभास-काल केवल वस्तु स्थितिचा पदार्थ नाहीं तो ॥५७॥
बंदी ? ती आंत तशी बाहेरहि या शिवासि जीवाची ।
पगडा तुजवरि पांचा वृत्तींचा तोंवरी न कोणाची ॥ ५७ ॥
आनंद गवसणारा मुक्तीचा-तुज तुरंग, मानस, हा ! ।
त्याचा बंदी जो तू ता जूं हें वांकवूनि मान सहा ॥ ५९ ॥
परि करुनि चित्तवृत्तींचा तूं अपुल्या निरोध, साम्यानें ।
मन हस्तगत स्ववशीं, ठेविशि कीं खड्ग हा जसा म्यानें ६०

ईश-प्रणिधानाच्या उमजुनियां हृद्रता जसें जनकीं ।
गुण वर्तती गुणीं, मी साक्षी केवल तया निरंजन कीं ॥६१॥
जें सत्य-परम शाश्वत-तेथें स्थापुनि अचंचला मतितें ।
उपहसुनी तद्दिर या गुणवृत्तींच्या सहस्त्रविध गतितें ॥६२॥
जरि डोलशील बापा परमानंदांत-कवण तुज तरि ते ।
एकल-कोंडीं कोंडी ? किंवा अंधार कोठडी करिते ॥ ६३ ॥
तूं अंतर्ज्योति ! तुला अंधःकारांत घाबरा ? पाहे ।
सुख दुःखाचें साधन बाह्य न परि ह्या मनांत बापा हें ॥ ६४ ॥
राजगृहीं काय कमी ? पक्वान्नें पांच नित्य शिजतात ।
प्रासादतल स्फटिकीं, कळस सुवर्णांत, घुमट रजतात ॥६५॥
चमकत गर्वे घेती अनुदिन शतशतसहस्त्र मुजरा जे ।
चतुरंग सिद्ध शद्वा झेलायासी खडी चमु ! जरा जें ॥६६॥
परि त्या प्रासादांचें निरखिशि तूं सूक्ष्म अंतरंग तसें ।
जरि तोलशील कैसा पर्णकुटीचा महंत रंगतसे ॥ ६७ ॥
उमजेल तरि तुला कीं बाह्यनिधी माधें वसेन सुखधन ।
रागोपहतिर्भोगान्नाचि कीं, संतोष सौख्यसाधन तें ॥ ६८ ॥
पक्वानें पांचाचि तीं नाहींत सहा ह्मणोनियां राजा ।
कोणी बटीक अपुली साध्य न होई ह्मणोनि युवराजा ॥४९॥
सोन्याचेचि कळसते नाचि रत्नांचे ह्मणोनियां राजा ।
केला मुजरा कोण्यासामंतें ना, ह्मणोनि युवराजा ॥ ७० ॥

काव्य नं. ४२०
ना.



होईन हाय! केव्हां मी अधिराजा, ह्मणूनिया राजा।
राजा होईन केव्हां आहे त्याचा ह्मणूनि युवराजा:-॥ ७१ ॥
दुःखी सदैव!! राजे झाले वेडे किती! किती त्याहीं।
छळ सोशिले! सुखाच्या दुखें घडल्याचि आत्महत्याही ॥७२॥
तो भीमसिंग, एलाग्याबूलसतो, शहा "जहानाचा,"।
मावघ गर्भ श्रीमंतींतचि मोटा न कां लहानाचा? ॥७३॥
हें चित्र पहा-आणिक हेंहि पहा चित्र संत तुकयाचें।
नित्यानंदीं फुललें मानस, हो मानसा कुतुक याचें ॥ ७४ ॥
मी डोंगरांत बंदी असतां वृत्तांत परिसिला कानीं।
होते सान्निध्य कोणीं अवलीया, त्या अनंत लोकांनीं-॥७५॥
बंदू द्वारीं अनुदिन तिष्ठावें दाट, ते स्वयें बसती।
एकान्त; आत्मरतिने डुलती झुलती मधेंच वा हसती ॥७६॥
परमानंदाचा जैं सावे न हृदीं वरी उमाळा तो।
उसळे! पायाखालीं गालीचा जीर्ण कुसुममाळा तो ॥७७॥
भाविक भक्तांहीं ज्या खिडकींतुनि फेकिल्या उशा गळह्या।
भूवरि आंत तशाची फिरतां चरणीं धुळींत चुरमळल्या॥७८॥
बंद मठांत दुरोनी फेंकिति जन जें जिथें जसें पडतें।
प्रातः कालीं खोली झाडूं ये त्या तसेंचि सांपडतें ॥ ७९ ॥
मोतीं, मखमल, मेवे-सांवरुनी त्या जरी निकें रचितो।
तरि "ने! कशासि येथें? ने ने झाडूनि सर्व कराचि तो!"॥८०॥

काकुळतीनें ऐसें विनवुनि, करवूनि रिक्त खोलीला ।
खेळे अवधूत पुन्हां परमात्म्याशीं पवित्र तो लीला ॥ ८१ ॥
दशवत्सर एकान्तीं खोली माजीच त्या असे वसती ।
खाती किंवा निरशन आच्छादित वा अवरूची बसती ॥८२॥
जेथुनि हिरवें एकहि शेत, न, वा मंजु विहग वा सखा ।
आकाशही दिसेना, नकळे कीं अद्धमास वासर वा; ॥ ८३ ॥
जी नित्य अशी तमसाच्छन्नाचि कीं ही मदीय काराही ।
एकलकोंडीं किंवा इतुकी मढली न अंधकारांही, ॥ ८४ ॥
त्या कोठडींत अपरिग्रह दे सर्वोपलाभ यां--यांच्या ।
कैवल्यानंदाचा अवलंब वरी न बाह्य विषयांच्या !! ॥ ८५ ॥
'विषमप्यमृतं' न 'क्वचित' नित्याचिया सुखदुःखविष यांच्या ।
कैवल्यानंदाचा अवलंब वरी न बाह्य विषयांच्या !! ॥ ८६ ॥
दुःख सुखाचें केवल अवलंबुनि बाह्य विषय जें असतें ।
सुखसत्व विशुद्धचि जें सुख तें कीं आत्मरतिंतची वसतें ॥८७॥
हें सत्यदीं चमके ! धृतिने आकंठ मन पुन्हां भरलें ।
मज कैंवि निरुत्साहें क्षणचि परी कीं खिळूनियां धरलें ॥८८॥
झालें लज्जेनें या ओशाळें ! परि भयासि नच न तसें ।
मन्मनमदुक्तची तें प्रथित स्मरतें स्वपूर्ण वचन तसें ॥ ८९ ॥
कथिलें जें म्यां देऊं दिव्योत्साहा तदा मदीय जना ।
यज्ञीं त्या जें सजलों स्वप्राणाच्या करावया यजना; ॥ ९० ॥

"पडले शत शत मत्सम तरि कां अगतिक असे ऊ भारत, हा ! ।
श्रीकृष्ण सारथी यद्रथ हांकाया स्वये उभा रत हा ?" ॥९१॥
मूर्खा ! थांबेलचि कीं पृथ्वी कारंत तू जरी मरशी ? ।
उपहसत असें माझें वचना व माझ्यावरी करी सरशी ! ॥९२॥
निश्चिंताचे मग बसलों पल मीः परि तें बघूनि रागेले ।
'नाइक' सोलायासी काथ्या लावुनि मला जरा गेले ॥ ९३ ॥
श्रम ते शांत मनें मी लागे करण्या सवें करीं धरुनी ।
स्वे स्वे कर्मण्याभिरत संसिद्धिसिलाभताति तें स्मरुनी ॥ ९४ ॥
जातां सोलाया जो काथ्या नियति स्वहस्त सोलोनी ।
पिंजुनि दिधला नियमित तितुका सांन्यासमान तोलोनी ॥९५॥
तां दिवस मावळू येः मग ज्या होतों धरूनि नियमासी ।
चित्तैकाग्रयासी मी साधित एकान्त विगत षण्मासीः ॥९६॥
ख्यात विवेकानंद प्रभु तो जो त्या महावितृष्णाचा ।
शिष्योत्तंस श्रीमान भगवद्भूदेव रामकृष्णाचा ॥ ९७ ॥
जडवादी अश्रद्धामतिचा कोंडा विकल्प असत्याशीं ।
आह्मांसे कपिल पातंजलिसूत्रित त्या सुसूक्ष्म सत्यांशीं ॥९८॥
जडवस्तुशास्त्र भावंताचे जो पटवी, तदुक्तिनें पटतां ।
योग न गोप्य परी तें शास्त्र, करी एक तंतुता पटताः--॥९९॥
नियमानुरूप त्या मीं चित्तैकाग्रीं करावया प्रगती, ।
पुरती सत्कमजूरी होतांची कीं धुवोनि कर मग तीः ॥१००॥

एकयाचि द्यौस्तनाच्या पिउनि पयासी अनंत मार्गानें ।
प्रभु नियत कर्म करितां, शस्यें, सुफलें, जलें, फुलें, गानें, ॥१२१॥
तत्तद्योग्यें भोग्यें नानाविध रंजवीत देशातें ।
एकाचि नद् नद्या त्या अंतीं आलिंगिती न देशातें ! ॥ १२२ ॥
ज्ञान भक्ति कर्मादिक धर्ममतें गमति साम्यता वरुनी ।
योग्यीं अनन्य योजक अत्यधिकेच्या तशीं जया वरुनी ॥१२३॥
तत्त्व प्रवसौवर्णाद्रीच्या ज्या; जीव यद्बचें तरती ।
श्रीमद्भगवद्गीता भावानें वाचिली अनंतर ती ॥ १२४ ॥
छाया सांजेची ये जों कीं, पुढती दिसेन वाचाया; ।
मग जो ब्रह्मीभूताचे असतांही देह मानवाचा या ॥ १२५ ॥
त्या तुकयाच्या भावें भक्तिरसपरिप्लुता अभंगा या ।
लागे, व्यायामा मी फिरतां नवपद बिळांत त्या, गाया ॥१२६॥
दंडा बेडीचे जे वाळे ते टाक करुनियां नामी ।
भजना त्या गुणगुणतां वाजविले ताल धरुनि यांनां मी ॥१२७॥
रात्री अर्धमुहूर्ताः नगरांतुनि देवदर्शनें करुनी ।
गृहणी गेहीं येतां प्रज्वलिती वन्हिधूम फुंकरुनी, ॥ १२८ ॥
हस्तीं जुइसम सुरभी धुतले तांदूळ घेत असतांनां ।
स्मरताति दशन मुकुला अपुल्या बालाचिया विहसतांनां, १२९॥
गुणगुणत गीत कांहीं, लगबगिनें भात वैरुनी त्याहीं ।
नसतील अजुनि ल्यालीं वस्त्रेंही सोवळीं सुदत्यांहीं ॥१३०॥

ग्रं. क्र.



सायंकाळ असा कीं रात्रीं माजीं पुरा न जो विरतो ।
तों निर्दीपा एकलकोंडीं भवतीं तमोनिधी भरतो ॥ १३१ ॥
आणी फेंकित किरणा, मज केवल दाविण्यांसि तम कां तो? ।
आसन्नमरण नाडी जेवीं निस्तेज तेविं चमका तों ॥ १३२ ॥
अपुल्या मधेंचि घेतां पाहुनि ज्यांना न घूकही जळतो, ।
कंदील एक मिणमिण अंगण सोडुनि पलीकडे जळतो; ॥१३३॥
लोहगजाच्या दाराजवळीं येऊन सहज मग बसलों; ।
बाहेरच्या तमासचि सहसा डोळे बघूं तया हंसलों, ॥१३४॥
दृक्शून्य तमीं नयना भुलवुनिया दृश्य कोणतें तें ने ! ;
जो धर्म इंद्रियांचा करुं तो धांवेचि तें अवशतेनें ! ॥ १३५ ॥
बसलों तों दिसली मज तेजाची चमक एक ओझरती ।
लवुनी निरखी पुनरपि तों चमके चांदणी नभी वरती !॥१३६॥
जोतिर्विद् ते जैसे अवकाशाची पुनः पुन्हां गणती ।
करुनी शतदां, वेधासाधुनि, शोधावया नभांगण, ती ॥१३७॥
डावी, उजवी, पुनरपि कलती, वदती, तशांत अति, कमती, ।
नलिका सुदर्शनक्षम करण्यासी दूर दर्शिनी श्रमतीः ॥१३८॥
मी मान तशी शतदां त्या लोखंडी गजांसि रोंवुनियां, ।
तिरपी शिरपी परि ती रोधें त्याची स्वदृष्टि खोंवुनिया ॥१३९॥
त्या फटितूनी दिसली चमक जिथोनी; सर्वेचि देहातें ।
मुडपुनि फरशी वरती खालीं, धरुनी गजांवरी हातें ॥१४०॥

योगी राजाचा त्या ग्रंथ श्री राजयोग मी उघडी, ।
शांत रसाचा पेला दूर करावा गमेचि जो न घडा ॥ १०१ ॥
तत्रस्थ समाधिस्था तन्मूर्तिसि देवमूर्ति समाचिनतें ।
वंदुनि, नासाग्रीं कीं रोवियलेंची सद्दाष्टेस्यां मन तें ॥ १०२ ॥
मन हें चंचल भारी ! दुर्निग्रह भासलेंची साधुजनाः ।
जडजाव अनभ्यस्ताचि त्यांत अहीं; आवरेचि तें मज ना ! १०३
प्रिय अप्रिय हेंचि कळे, नकळे परि विहित वा तयास हित; ।
जिकडुनि तिकडुनि धांवे ठकवुनि बुद्धीस इंद्रियां सहित ! १०४
वेडा निसर्ग आहे मनुज मनाचा जरी असा पडला ।
तरि दुष्कर भूसेवाव्रतें जो कांहीं करांत सांपडला ॥१०५॥
निष्काम कर्म योगाचा मज ठेवा, तयाबळें आधीं ।
लेश वशंवद होतें स्वच्छंदाची सुटोनि मन आधीं ॥ १०६ ॥
यास्तव तें जरि जेव्हां तेव्हां इतरत्र सहज लव जातें ।
तरि पकडतांचि लज्जाहत दे सोडोनि वृत्ति भवजा ते ॥१०७॥
घेतां घेतां ऐशा वृत्ती ध्यानस्थ चित्ति विलयातें ।
ये सुखद अनुभवाया आत्मरतीचा प्रसाद तिल यातें ॥१०८॥
मोहक मोहक झरतीं शांत रसाचें हृदांत पाझर ते ।
कैवल्यामृत निधिचे उडतां कांहीं तुषार ओझरते ! ॥ १०९ ॥
तिलही प्रसाद तुमच्या प्रभुजी ! मजसी अदृष्ट चरणांचा,
जरि कीं शीतळवी पल मज समही हो त्रिताप शरणांचा ॥११०॥

असणाराचि तें तरि कीं जे तव अधरामृतासि प्यालेले ।
हे केवल ! त्या कैवल्यानंदाच्या पुरांत न्हालेले !! ॥ १११ ॥
वंदी वारंवाराहे " कस्मै देवाय " त्या तंई भावें ।
लाभास्तव स्तवार्हा सद्‌गुरुच्या हें स्वचित्त लोभावें ।११२॥
श्री रामकृष्ण जैसे ऐकुनि जडवाद दिव्य हेतूचे,
मोक्षार्थचि त्या अश्रद्धाचे, सत्यार्थ तर्क केतूचें, ॥ ११३ ॥
अन्वर्थ नरेन्द्राचे; " ईश्वरनाहीं ' वदे ' वदावा: वा ।
आस्तिक्य सत्य तरि तो मजसी प्रत्यक्ष देव दावावा!॥११४॥
स्पर्शुनि हंसले " बाला ! अचिरचि तूं पाहशील देवाला !।
स्पर्शोचि त्या विवेकानंदा घे, केवळ न नांवाला ॥ ११५ ॥
स्पर्श तसा करुनि तसा देवा दाविल मला अहा काय ?।
गुरु लाभे तो ? कुरवंडीन तयावरुनि आजि हा काय! ॥११६॥
सकल गुरूंचा गुरुवर! भगवान्‌ श्री कृष्णजी स्वयें कथिती ।
अमृता अमृतास्तद जैं धर्मक्षीराब्धिला पुन्हां मथिता ॥११७॥
भिन्नमता गमताती यद्यपि बहु भिन्न दिक्‌ प्रवाहांही ।
रस वाहिनी रसातलिं गमता निष्ठुर विरोध वा हा हीं ॥११८॥
अंतर शत शत कोसांचें तें त्यांच्या पथांत पाहुनियां ।
पारि अचलाधिप शिखरीं निश्चल कांहीं मुहूर्त राहुनियां ॥११९॥
विस्तीर्ण आसमंतात्‌ भूमीचा चित्रपट अशेष तया ।
दृष्टि क्षेपीं घे त्या नाढळतो तो विरोध दोष तया; ॥ १२० ॥

एक्याचि यौस्तनाच्या पिउनि पयासी अनंत मार्गानें ।
प्रभु नियत कर्म करितां, शस्यें, सुफलें, जलें, फुलें, गानें, ॥१२१॥
तत्तद्योग्यें भोग्यें नानाविध रंजवीत देशातें ।
एकाचि नद नद्या त्या अंतीं आलिंगिती न देशातें! ॥ १२२ ॥
ज्ञान भक्ति कर्मादिक धर्ममतें गमति साम्यता वरुनी ।
योग्यीं अनन्य योजक अत्यधिकेच्या तशीं जया वरुनी ॥१२३॥
तत्त्व प्रवसौवर्णाद्रीच्या ज्याः जीव यद्वचें तरती ।
श्रीमद्भगवद्गीता भावानें वाचिली अनंतर ती ॥ १२४ ॥
छाया सांजेची ये जों कीं, पुढती दिसेन वाचाया; ।
मग जो ब्रह्मीभूताचे असतांही देह मानवाचा या ॥ १२५ ॥
त्या तुकयाच्या भावें भक्तिरसपरिप्लुता अभंगा या ।
लागे, व्यायामा मी फिरतां नवपद बिळांत त्या, गाया ॥१२६॥
दंडा बेडीचे जे वाळे ते टाक करुनियां नामी ।
भजना त्या गुणगुणतां वाजविले ताल धरुनि यांनां मी ॥१२७॥
रात्री अर्धमुहूर्ताः नगरांतुनि देवदर्शनें करुनी ।
गृहणी गेहीं येतां प्रज्वलिती वन्हिधूम फुंकरुनी, ॥ १२८ ॥
हस्तीं जुइसम सुरभी धुतले तांदूळ घेत असतांनां ।
स्मरताति दशन मुकुला अपुल्या बालाचिया विहसतांनां, १२९॥
गुणगुणत गीत कांहीं, लगबगिनें भात वैरुनी त्याहीं ।
नसतील अजुनि ल्यालीं वस्त्रेंही सोवळीं सुदत्यांहीं ॥१३०॥

ग्रं. क्र.

सायंकाल असा कीं रात्रीं माजीं पुरा न जो विरतो।
तों निर्दीपा एकलकोंडीं भवतीं तमोनिधी भरतो ॥ १३१ ॥
आणी फेंकित किरणा, मज केवल दाविण्यांसि तम कां तो? ।
आसन्नमरण नाडी जेवीं निस्तेज तेवि चमका तों ॥ १३२ ॥
अपुल्या मधेंचि घेतां पाहुनि ज्यांना न घूकही जळतो, ।
कंदील एक मिणमिण अंगण सोडुनि पलीकडे जळतो; ॥१३३॥
लोहगजाच्या दाराजवळीं येऊन सहज मग बसलों; ।
बाहेरच्या तमासचि सहसा डोळे बघूं तया हंसलों, ॥१३४॥
दक्शून्य तमीं नयना भुलवुनिया दृश्य कोणतें तें ने! ।
जो धर्म इंद्रियांचा करुं तो धांवेचि तें अवशतेनें ! ॥ १३५ ॥
बसलों तों दिसली मज तेजाची चमक एक ओझरती ।
लवुनी निरखी पुनरपि तों चमके चांदणी नभी वरती !॥१३६॥
जोतिर्विद ते जैसे अवकाशाची पुनः पुन्हां गणती ।
करुनी शतदां, वेधासाधुनि, शोधावया नभोंगण, ती ॥१३७॥
डावी, उजवी, पुनरपि कलती, वदती, तशांत अति, कमती, ।
नलिका सुदर्शनक्षम करण्यासी दूर दर्शिनी श्रमती: ॥१३८॥
मी मान तशी शतदां त्या लोखंडी गजांसि रोवुनियां, ।
तिरपी शिरपी परि ती रोधें त्याची स्वदृष्टि खोंवुनिया ॥१३९॥
त्या फटितूनी दिसली चमक जिथोनी; सर्वोचि देहातें ।
मुडपुनि फरशी वरती खालीं, धरुनी गजांवरी हातें ॥१४०॥

ऊर्ध्वमुखा कुंचित तनु, देवा सन्मुख सुभक्तकीं नतंसा ।
स्पष्ट दिसावें नभ त्या कोठडिंतुनि साधिलाचि कोन तसा १४१
कोर लहान नभाची दृश्या येथुनि परंतु संगम ते ।
सप्तर्षींच्या सातामालांचें तांत बघुनिया गमतें ॥ ४१२ ॥
विलसे न विरल तारक नील नभाची समोर कोर, मला ।
देवी अनंततेच्या चुनडीचा पदर पालवी गमला ! ! ॥१४३॥
भास्वान वदताते तुला, हे भानो ! विश्वचक्षु मिरवीशी ।
पदवी तूं : तेजानें आह्मां अपुल्या पदार्थ करवीसी ॥ १४४ ॥
दृश्य अशेष धरिनी वदिलें जें हुडकिता उषा युवती ।
येशा अरुण पुरस्सर पूर्वेला तूं प्रभाकरा ! तंव ती ॥ १४५ ॥
प्रत्येक कीड मुंगी मशक रजःकणाहि सूक्ष्म असतांनां ।
ठेले दृग्गोचर ज्या तुझिया तेजें, मनांत नसतांना ॥ १४६ ॥
संशय किमपि तशां त्वां लपवीलीं हीं सहस्र असशील ।
ब्रह्मांडें मनुजांच्या दृष्टीपासूनि, तुजसि सच्छील ॥ १४७ ॥
अव्याजमती पूर्वज दिवस असे बोलुनी अनंतरती ।
जी ये रात्रि ह्मणुनि तिज निर्दशक गणुनि तैं स्वपा करती १४८
एक्या ग्रहासि दावुनि लपवी शतसूर्य मालिका तो कां ।
जी श्रीकृष्णमुखासम दावुनि विश्वस्वरूप दे तो कां,-॥१४९॥
कवण यथार्थ तिमिस्त्रा ? दृक्साफल्यासि देसि तूं कां ती ? ।
सोनेरी तव किंवा दिव्यतरा श्यामला तिची कांती ? ॥१५०॥

ये संशय कैं उगवें, दिवसकरा ! उगवतो कदा भुविस ! ।
उदया नंतर किंवा अस्तानंतर तुझ्या खरा दिवस ! ! ॥१५१॥
तुच्छ उपग्रहची जो स्वयमपि परभुक्त भूग्रहाचा कीं ॥
धावे दिनरात तिच्या, दासीचा दास, बद्धहा, चाकीं, ॥१५२॥
उच्छिष्ट सूर्यकिरणां चोरी लावूनि भूमिचा वशिला ।
मिरवी मग जो त्या सित छत्रा अपुलें तसेंचि; त्या शशिला १५३
निर्जीवन नीरस निस्तेज कलंकित तनूहि ते ज्याची, ।
त्या वदती तारापति !-सप्तर्षींनों, अनंत तेजाची ॥ १५४ ॥
जगतेंचि सात तुह्मी-तुह्मां तारे ! असेंचि हा तात, ।
चोर ऋषींचे राजे बुध्यंधांच्या पुरांत होतात ! ! ॥ १५५ ॥
क्षुद्रधरेवरिला मी अत्यंत क्षुद्र एक कीटकतो ।
अपुल्या वदनावरती बसलो लावूनिया निर्का टक तो ॥१५६॥
तें कां दिसे तुह्मांसी ? कीं किरणाश्वा असे पिटाळुनिया, ।
बसताति पहारे हे शत मजवरती तथापि टाळुनिया; ॥१५७॥
कोणी न साह्य व्हावें, मजसी कोणी न शद्ब बोलावा ।
द्याया सहानुभूतीचा ह्या जळत्या ह्रदासि ओलावा, ॥ १५८ ॥
भिंतीभवतीं भिंती; कुलुपावरती कुलूप जरि टपलें, ।
चुकवीत तया सर्वां तुह्मीं मज भेटलांतची अपुलें ! ॥१५९॥
ऋषियोग्य, ऋषीश्वर हो, उपकारा उपकृते किती म्या तें ।
वानावें दीनदयालुत्वाच्या युष्मदीय माहिम्यातें ! ॥ १६० ॥

बंदींत मज बघूनी कां ते तुमच्या हृदांत कळकळतें?।
कळकळतें मज बघुनी हृदय असें कां तुह्मांप्रती कळतें? ॥१६१॥
अथवा वाहे वारा मंजुल, मोहक सुगंध सुमनांचा, ।
निरपेक्ष उपकृतितें करणें किंवा स्वभाव सुमनांचा, ॥ १६२ ॥
तेंवि प्रकाशतांचां कांतें चिंतुनि नवा कळून हि तें ।
साधित तमोहतांचा, सप्ताग्नींत त्या स्वयें जळून हितें?॥१६३॥
सप्ताग्नींत जळोनी काय स्वर्गीहि साध्य साधितसा ? ।
कीं ब्रह्मचर्य पालनिं संसाराचा नसे उपाधि तसा ! ॥१६४॥
बारे रविमाला अमूचि वारी अमुच्या जशी तमाला ही ।
वारू तमा कुणाच्या झटती भवदीय सात माळांही ? ॥१६५॥
किंवा ऋषी पुरातन तैसे तुह्मी ऋषी असूनी ही ।
भोगा गृहस्थता त्या ललनालिंगन सुखीं वसूनी ही ? ॥१६६॥
तरि पांडवासि तैसी सातां एकचि तुह्मांसि अभिरामा ।
भोगूं भूलललना? वा एका एकचि जशी सती रामा? ॥१६७॥
ज्या एक भूत धात्री स्वकरें स्पर्शुनि समुद्र रशना ही ।
स्थापी तिच्यांत केवल गर्भा, अन्य स्त्रियांसि वश नाहीं, ॥१६८॥
सद्धर्म भीरु अमुचा भानुव्रत हें सदा करी नतसा; ।
तुह्मांत एक पत्नी, सप्तर्षीनां, जरी कुणी न तसा ॥१६९॥
संयमशील तरि तया एका पत्नी अनेक कां वरती? ।
एक्या सूर्या भवतीं तुमच्या पृथ्वी अनेक कां फिरती ? ॥१७०॥

सेतु विमांनांचा कां पृथ्वीमध्यें असे ऊ त्या केला ।
जाऊं प्रेमास्तव वा विजयास्तव राम जेवि लंकेला ? ॥१७१॥
चित्र विचित्र पसरुनी मोर असेची तिथें पिसारा तो ।
नाचे सस्पर्ध अणी वन पसरुनि कुसुमवृंद सारा, तो ? ॥१७२॥
तेथेंहि मृगजलाच्या मागें हरिणें अशींच वा मागें ।
आणिक धांवति मानव प्यायासी कां सुखासवा मागें ? ॥१७३॥
विद्युच्छास्त्राची हीं विद्या अवगत असे तया कां ते ? ।
वाही सागर पृष्ठावरती ऐशाचि बाष्प नौकांतें ? ॥ १७४ ॥
किंवा शास्त्रपटुत्वीं आह्मांहुनि अर्हताति मानातें ।
मेघामागें लागति पळवुनि तद्वाल कां विमानांतें ? ॥ १७५ ॥
रस, रूप, गंध, शब्द स्पर्शासी जाणतीच तनु ज्यासी ।
वसती वसुधे वरती अपुल्या आह्मांसमान मनुजांसीः ॥१७६॥
उत्क्रांतिगतिपरत्वें वा जे इंद्रियरसासि अनुभविती ।
पांचाहुनि या अधिका, नानाविध जों विकीर्ण हीं भवती, ॥१७७॥
आह्मासि अगोचर परि यास्तव गोचर ज्याप्रती असती ।
गौप्यें विगूढ सृष्टीचीं, कीं मानव असे तिथें वसती ? ॥१७८॥
सूर्या पासुनि जितुकी पृथ्वी अमुची सुदूर ना तितकी ।
मंगल अमुचा जितुका सूर्यापासुनि समीप ना इतुकी- ॥१७९॥
पृथ्वी तुमची असतां ऐशा मध्यंतरांत फिरतांनां; ।
तुह्मां पासुनि तेजो गर्भा एवं विशिष्ठ धरितानां ॥ १८० ॥

अश्रुत, अतर्क्य, अद्भूत, उत्क्रांतीच्या क्रमा तिथें होतें ।
प्रादुर्भवन? भुवन कीं आमूलात् भिन्न विभवची होतें? ॥१८१॥
बांधुनि विमानमय दे गगनीं लीलापुरासि अधरासी ।
हार्ही ललना पण ते पुरवुनि ती ती रसाल अधरासी? ॥१८२॥
पवनाकर्षित सत्त्वाहारी होतां, विलुप्त हत्या ही, ।
भूगामी, जलगामी, गगनगवा भूत मात्र जें त्यांहीं, ॥ १८३ ॥
घेउनि संघटने कां एक्या राष्ट्रांत एक राट् प्रभुच्या, ।
भूत दयेच्या ध्येया करुनी वास्तव, सभेंत त्या विभुच्या ॥१८४॥
मृग, मत्स्य, सिंह, मूषक, नाग, कपी, श्येन, चटक, वा, नरते ।
पंजा करवा ना परि पंचांकरवी सुनिर्णया करिते? ॥ १८५ ॥
मंजुलतेसहची कां संगीतावरि सुगंध झुलताती ? ।
कां त्या सुगंधतेसह गीतें चंदन वनांत फलताती? ॥ १८६ ॥
वाचा फुटे गुलाबा? किंवा फुलती गुलाब मनुजाला? ।
सांगा सप्तर्षी हो! काय चमत्कार जो तिथें झाला!! ॥१८७॥
त्या शामकर्ण तुरगासम रामाच्या, नभीं हि अधृत रणी ।
जो किरण इथें ये हा, मागे सारित अनेक ते तरणी, ॥१८८॥
तुमचा किरण, ऋषी हो तुमच्या पासूनि तो कधीं सुटला? ।
दिसतां मज यत्तेजोबुद्बुदकृत कार्यसा सर्व फुटला? ॥ १८९ ॥
जवनांत जवन अपुले घोडे भरधांव सोडुनी पवनें, ।
जरि चेतवावया त्या आधिकाचि पाठीवरी वनोपवने, ॥१९०॥

२०९३.

चाबुक हंजार पाती ते सडकीले तडाड जों तुटती ।
तरि ज्यांपुढें मशकसे बाजी माजी पलांतची हटती, ॥१९१॥
जरि त्यांहि, हे प्रकाशा, तुरगांसी तूं तुझ्याहि चपलांसी ।
सोडिसि सप्तमुखासी दवडुनि जलही पिऊं नच पलासी, १९२
आक्रामत पलांपलिंकीं कोसांच्या एक एक लक्षा या ।
तरि लागतील शत शत वर्षे आश्रम यदीय लक्षा या, ॥१९३॥
ऐसे नभस्तपोवनिं करित तपस्या पिऊनि आतप ती ।
सप्तर्षी हो ! तुमच्यासम नचि कां ते दुजे ऋषी तपती ? १९४
तरि जो प्रत्यावर्तित शतकांपूर्वी प्रकाश भूवरिला ।
तो आजची अहा त्या ताऱ्यांवरती असेल कीं धरिला ! १९५
धरिला असेल तरि कीं छाया लिपिहीं, ऋषी ! धरा होती ।
जी त्यां किरणांपाशीं पाहूं कैशी तदा धरा होती ! ॥ १९६ ॥
हाडें हुडकित, उकरित भूस्तर, शुष्कौघ, भग्नसेतु, कडे; ।
मरुभू, पवत, जुळवित पत्रांचे कीट गलितसे तुकडे, ॥१९७॥
हे ऐतिहासिक संशोधक वेडे श्रम कशास करिताती ।
तर्क वितर्कांमध्यें सत्याचा शेष जीव हरिताती ! ॥ १९८ ॥
असुनी उपाय उत्तम ऐसा दवडित तया सदा वाया ।
अघटित सोय असोनी घटना प्रत्यक्ष यांस दावाया ॥१९९॥
दावीलचि जी आणि त्या त्या ताऱ्यावरील घटनाही ।
प्रत्यक्ष! आनुमानिक लागत पट वा जुनाट घट नाहीं !! ॥२००॥

केवल विमान तत्क्षम घेउनि उड्डाण व्हाल हो करितें।
वातावरणीं, वातावरणाभावांत वा, नभीं जरि तें ॥ २०१ ॥
केवल जरि साधुं अणि, सकुटुंबाचे कीं निघाल मनुज हितें।
अयुताद्दुलभ्य ताऱ्यांही कीं पांचोंत पथज तनुजहि ते ॥२०२॥
तरि हो प्रत्यक्ष पहा कैशी झांशीकरीण अमरातें।
लढवाय्यि समरलक्ष्मी लक्ष्मी लढवी स्वधर्म समरातें ॥२०३॥
त्याच्याहि पलीकडच्या ताऱ्यांवरुनी स्वयें पहा कां ते।
पाझरवितील पाषाणांसी ऐशाहि भूप हांकांतें ॥ २०४ ॥
"दे बंधु ! दान जीवन ! दे ! दे !" ऐकूनि हाय ना प्रखरें।
लोभें मारी बांधव, कथिती जे द्वेशदुष्ट विप्र खरें ? ॥ २०५ ॥
-मारी तो ! जो श्रीमान् भारत नृपधर्म मूर्त अवतरला।
सुश्लोक राजयोगी योगीराजा अशोक भवतरला ॥ २०६ ॥
निर्मल हिमशीतल यद्वचनीं भवतप्त जीव लोभावा,।
धाडी देव कधीं तरि-सत्यचि जो देवदूत शोभावा ॥२०७॥
त्या शांत दांत भगवद्यश-पावन येशुच्या पदा नमुनी।
देखा पुनरुत्थाना घे कीं तें करुनी आत्मदान मुनी ? ॥२०८॥
जोंवरि मानव जगतीं, जगतीं ज्याचें न सुयश हो मरो।
देखा गाई रचुनी ईलीयड कां स्वयेंचि होमर तें ? ॥ २०९ ॥
माक्षिक देशीं सत्यचि जाउनि कीं भारतीय वसताती।
श्रीरामचरणकमलीं त्या उपवनिचेहि मधुप रसताती ? ॥२१०॥

वीससहस्रें वर्षें गणुनी तत्कालकिरण आज, गतो ।
घेतां घेतां कवण्या ताऱ्याच्या तो असेल हा जगतीं: ॥२११॥
त्या ताऱ्याचें वरती मग वीक्षण जाउनी करा हो तें ।
केव्हां आर्यावर्ती करिती आर्यर्षि ओक राहों तें ? ॥ २१२ ॥
का उत्तर धृवींची देवासुर ते पुनःपुन्हां लढले ? ।
त्या मंथनांत रूपां मोहनिच्या व्हा परी न हो गढले ॥ २१३ ॥
तो × हिमानिधि किंवा तो हिमकरची मूल लोक पितरांचा ? ।
प्रभव पहा प्रलय पहा जीवाणूंचा तसाच इतरांचा ॥२१४॥
इतरांचा ? केवल जे भौमिक त्यांचा ! न शक्य सकलांचा ।
विश्वेतिहास लिप्से, तुजसी वेढा अकाट्य विकलाचा ॥२१५॥
कल्पविमानीं हो कां तूं ताऱ्यांचे जिंन करूनि नभां ।
जाशील उंच शोधित शोधित कितिही जरी धरून नभा ॥२१६॥
इतिहासाचें पाहिलें पान न मिळणें कधीं पहायातें: ।
'आरंभ तुझा दुसऱ्या पानापासूनि' शाप हा यातें ! ! ॥२१७॥
मग जें सांगू सारें सांगाते जें जें मनासि मानवतें, ।
इतिहास कथन ना ! उपहास कथा त्या रचोत मानव तें: २१८
कीं ह्या गगनांत तुह्मांसम पाहिल्यानें अनंत हे खचिलें ।
तारे प्रभुनें रंजवु मनुजा ? मनुजार्थ विश्व हें रचिलें ! ॥२१९॥

---

×हिमानिधि—बर्फाचा उत्तरधृवीय समुद्र.

मृग मत्स्य निर्मिलें कीं आह्मीं खावें तया, न राखावें ।
( तरि कां सिंह व्याघ्र न कीं त्यांनीं ही अह्मां नरा खावें )२२०
विस्तृत सागर झाले खारट आह्मांसि मीठ द्यायातें ।
झाले उन्नत पर्वत, गहन वनें, सत्वरा नद्या या तें ॥ २२१ ॥
आह्मीं करुनि कृपा कीं त्यां भोगावें ह्मणूनि खटपटती ! ।
आह्मांविण निर्माल्या विलया जाईल सृष्टि झटपटती ! ! ॥२२२॥
वाघूळ जशी पायां उलटें टांगूनि आपुल्या वरती ।
मानी मनांत माझें पायचि आकाश अधर सांवरतीं, ॥ २२३ ॥
जालीं स्वयंमहत्ता मोहाच्या या तसेचि फसलेले ।
दंतकथासी मानुनि धर्मकथा जे विमूढ बसलेले ॥ २२४ ॥
ते पाहती न कीं भू कवण्या अडदांड दुष्ट हेतूनें ।
गांठूनि भरडली जरि जळत्या दांढांत धूम केतूनें ॥ २२५ ॥
या चंड कारखान्यामध्यें भासेल उणिव ना तितुकी ।
चुकतां एक मशक या भासे पक्षीगणां मध्यें जितुकी ! ॥२२६॥
आह्मीं किती ! जियेसी अचला विश्वंभरा स्थिरा धरणी ।
गारवुं असे तिची ही हीन दशा ही ! परंतु तो तरणी ? ॥२२७॥
हा रवि अमुचा, ज्याची एक न परि कीं त्रिविक्रम ख्याती ।
ज्या वेद विश्वकर्मा देती देवा सुभव्य आख्या ती?–॥ २२८ ॥
आजि तेहि सूर्यनारायण जे अमुचे ?–नभांत दिसते ही ।
जी दिव्य वियद्गंगा–तींतिल उडते तुषार आजि तेही !! ॥२२९॥

कीं जें गणितां गणितां, ऋषि हो ! आधींच गुंगवी मतितें ॥
महदंतरावरी त्या घेत असा कीं तुह्मीं जिथें स्थितितें ॥ २३० ॥

तेथेंहि जरी तुमच्या वरती लावूनि दूरवीक्षण तें
होतील तुह्मांवरिले ज्योतिर्विद कीं पुन्हां असे गणते, ॥ २३१ ॥

महदंतरावरी तरि पुनरपि इतुक्या सुदूर बसणारे ॥
असतील तुह्मांपरिही तारे दुसरे तयांस दिसणारे ॥ २३२ ॥

त्यांवरि? त्यांवरि? त्यांवरि ? हे प्रभु ! ओतूनि दिव्य हेमजलें ॥
एका परिएक किती असशी राचले असंख्य हे मजले ! ॥२३३॥

होय असंख्यात तयां अंतिम जो-त्यांवरी ? तया वरती ? ॥
नयनें मिटुनी पुसतां पुसतां प्रश्नावली न आवरती ! ॥ २३४ ॥

विश्वस्थिति मर्यादेचा जो तैं होय विस्मिता मतिला ॥
संस्कार, अमर्यादित, मर्यादित वाङ्मयां जरी काथिला ॥ २३५ ॥

तरि किमपि तदर्थ कसा गवसे उद्गार हा हताश तदा ॥
अनंत ! अनंत !! अनंत !!! वदुनी वदणें अनंतची शतदां !२३६॥

वाळूळ तुच्छ भूचें, मानव मुंग्यांसमान वापरती ॥
तुच्छांतिल तुच्छ तरी मोहुनि आपुल्याचि वैभवा वरती ॥२३७॥
क्षणिक किती, क्षुद्र किती ! आशा आनंद शोक हे अमुचे ॥
विझगार एक दिवशीं, ऋषि हो ! हे सात सूर्यही तुमचे ! ॥२३८॥
प्राणासमची आपुल्या पाहूनी प्रियतमासि मरतांनां ॥
कीं योगमुक्तचित्तें भगवद्गीतार्थ मनन करितांनां ॥ २३९ ॥
उपरति नेघे मानस कवणाचें कीं जरी पुरें विटुनी ॥
थापांसि चटुल आशेच्या या, ग्रंथी हृदांतल्या तुटुनी ॥ २४० ॥
आश्चर्य गमे, तरिही तें नचि आश्चर्य, हें मला गमतें ॥
ज्योतिर्वेदाची कीं ज्यांना केलीं अधीत सांग मतें; ॥ २४१ ॥
जे विश्वदर्शना ह्या बघती अनुरात्रि-तहि धीट कसे ॥
ज्योतिर्विद कीं संसाराच्या जाळ्यांत गुंग कीटकसे ॥ २४२ ॥
ना हे तारे ! ते ना वेदहि ! दिव्याक्षरें अशीं प्रखरें ॥
दिग्यंत्रिं वेद हेची प्रकटविली जे अपौरुषेय खरें ! ! ! ॥ २४३ ॥

हा दिव्य वेद ! तुमचे अर्थ स्फुरती तुह्मां प्रतीकांते ? ॥
कां सार्थता मनुजसंवेदानिंची ये तुह्मांप्रती कां ते ? ॥ २४४ ॥

तरि कां मज्जा पिंडीं ब्रह्मांडालय अनंत तेजाच्या ? ॥
अंत मनांत तया हें मनची मानी अनंतते ज्याच्या ! ॥ २४५ ॥

नयनावांचुनि रवि नातरि रविवांचूनि नयन कां होते ? ॥
बीजतरूचें कोडें सोडवुं भिन्नाचि वद्            ा हो तें ॥ २४६ ॥

हे तेजाचे सागर होतिल अपुल्या क्रमेंचि पेयाचे ॥
पृथ्वी, प्राणी, मानव संज्ञापत्वा स्वयेंचि घेयाचे ॥ २४७ ॥

आह्मां मनुजांची ही पार्थिवता घेत शतविकारांशीं ॥
व्युत्क्रम परंपरेनें तेजाची हो न होय कां राशी ? ॥ २४८ ॥

तुमचे अह्मांत ऐसें आमुचें तुह्मांत रूप ओसरतें ॥
सरतें रूप द्वैत प्रकट तरी सत्व एकची उरतें ॥ २४९ ॥

सप्तर्षी हो ! ऐसें तुह्मांसी तत्ववाद ते करितां ॥
हा बाष्पबिंदु माझा सिंधुंत विश्वाचिया अहो झरतां ॥ २५० ॥

दिवस वसंतीं तैशी गेली कारागृहीं पहा राती ! ॥

येतो आतां ! आज्ञा निजण्या दे बदलतां पहारा ती ॥ २५१ ॥

अंधार कोठडीच्या, हरण्या हृदिंच्या तशा तमाला ही ॥

मज विश्वदीप्ति संतत तुमच्या देवोत सात मालाही ॥ २५२ ॥

रुद्राक्षांच्या तैशा बदलाकिं या साज सातमालाही ॥

त्या व्योमकेशदेवा वाही कविता सदुत्तमाला ही ॥ २५३ ॥

२८५३.

स्त्रियांचें पहिलेंच आणि प्रमुख साप्ताहिक.

# हिंदमहिला.

संपादिका—सौ. अवंतिकाबाई गोखले.

थोड्याच अवधींत हें पत्र अत्यंत लोकप्रिय झालें आहे. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, आफ्रिका वगैरे देशांत व हिंदुस्थानांत सार्वत्रिक थें जेथें मराठी वाचक आहेत, तेथें हें पत्र जात आहे. उच्च ललित वाङ्मयाबरोबर, चर्चात्मक लेख, स्त्रियांच्या चळ- नानाविध माहिती यांत देण्यांत येत असते. मराठी भाषेंत होणाऱ्या कोणच्याहि वर्तमानपत्रांतील गोष्टींपेक्षां यांतील उच्च दर्जाच्या व सरस असतात. वा. व. व्ही. पी. नें रु. ३८=

## याच पत्रिकेमार्फत

## कै. श्री. रमाबाई रानडे यांचें चरित्र.

सप्टेंबरांत प्रसिद्ध होईल.

वि. प. नागपूरकर.

व्य. हिंदमहिला.

हिंदमहिला कार्यालय, मुंबई नं. ४


दर्जाच्या

वळी, :

प्रसिद्ध

गोष्टी